## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/११/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १७/११/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी हफीज कलीम खॉ पठाण वय ३० वर्ष, रा. सौदागर मोहल्ला भंडारा हा आपले कामावरून घरी परत आला व घरा बाहेर स्वःताची मोटार सायकल हिरोहोन्डा पॅशन लाल काळया रंगाची क्र. एमएच ३६ बी २०१९ कि. १५,०००/–रू ची कोणीतरी अज्ञताम चोराने सौदागर मोहल्ला येथुन सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे मॅडम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २३/११/२०१६ रोजी ०५.३५ वा. दर. यातील दोन्ही आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये मालकाचे सागंनेवरून ४ ब्रास रेती कि. ८,०००/–रू ची खमारी येथुन अवैध रित्या चोरून नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा कुंरजकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९,१०९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरून इसमास बासाच्या काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ११/११/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी कुनाल नरेन्द्र गजभिये वय २२ वर्ष रा. बौध्द वार्ड बेला यांचे पाणठेल्यात आरोपी गेला व त्यास सिगारेट मांगीतली असतांना फिर्यादीने सिगारेटचे पैसे मांगितले असता आरोपीने भांडण शिवीगाळ करून बासाच्या काठीने फिर्यादीच्या डावे हातावर मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२५,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गायधने पो. स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) महीलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २३/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील तिन्ही आरोपीतांनी फिर्यादीला पाहुन तुझ्या मुलीला घेवुन पळालो तर तु काय करशील असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली असता फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपीतांनी संगमत करून थापड बुक्यानी मारपीट केली असता फिर्यादीची मुलगी ही भांडण सोडविण्यास धावली असता तिला सुध्दा कोणत्यातरी वस्तुने डावे हाताला मारहान करून जखमी केल्याने व धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३२३,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर ,करडी तुमसर,सिहोरा,साकोली ,लाखांदुर व पालांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०२ लिटर हातभट्टी दारू+सडवा मोहा १४० किलो कि. १२६००/–रू. व १५ मिलीलीटर ३०० एमएल देशी दारू कि.४११०/–रू तसेच जुगारातुन कि. ५३४६४ /–रू असा एकुण कि. ६६,०६४/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

24/11/2016

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९५५२५६५८५२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.